**श्री. ल.बे.हारोडे, सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुख्यालय, मुंबई यांना निलंबनाच्या ९० दिवसानंतर शासन सेवेत पुर्नस्थापित केल्याचे मानून सेवाविषयक सर्व लाभ देणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**

**शासन आदेश क्रमांक-वैमाशा-२०२४/प्र.क्र.५७/ग्रासं-३**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय-विस्तार, मुंबई -४०० ०३२.

दिनांक - १६ सप्टेंबर, २०२५

<u>संदर्भ :-</u> १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निप्रआ-१११८/प्र.क्र.११/११-अ, दि.९ जुलै, २०१९

२) शासन आदेश क्रमांक-वैमाशा-२०२३/प्र.क्र.९३/ग्रा.सं.३ दि.९ ऑगस्ट, २०२३

३) पुर्नस्थापित शासन आदेश क्रमांक - वैमाशा-२०२३/प्र.क्र.१३१/ग्रा.सं.३, दि.६ मे, २०२४

४) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मुळ अर्ज क्र. ६९/२०२०, दि.०७/०७/२०२१ चे आदेश.

५) श्री. ल.बे.हारोडे, सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांचा दि. ०४/०६/२०२४ रोजीचा विनंती अर्ज

<u>शासन आदेश:-</u>

श्री.ललित बेनीराम हारोडे, सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र यांच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्याने त्यांना अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, शासन आदेश, दि. ९ ऑगस्ट, २०२३ अन्वये दि. १ ऑगस्ट, २०२३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर दि. ६ मे, २०२४ च्या शासन आदेशान्वये श्री. हारोडे यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्यात आले आहे. श्री. हारोडे यांनी संदर्भ क्र. ५ येथील अर्जान्वये निलंबनाच्या दिनांकापासून ९० दिवसांनंतर त्यांना शासन सेवेमध्ये पुर्नस्थापित केल्याचे समजून निलंबन कालावधीतील वेतनासहीत सर्व सेवाविषयक लाभ देण्याबाबत विनंती केली आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. १९१२/२०१५ श्री. अजयकुमार चौधरी विरुध्द भारत सरकार या प्रकरणामध्ये शासकीय कर्मचा-याविरुध्द ९० दिवसांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले नसेल तर अशा कर्मचा-यांचे निलंबन ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी पुढे चालू ठेवता येणार नाही, असे आदेश दिलेले आहेत. सदर निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी मुळ अर्ज क्र. ६९/२०२० या प्रकरणामध्ये याचिकाकर्त्याला ९० दिवसांनंतर सेवेत पुन:स्थापित केल्याचे मानून सेवाविषयक सर्व लाभ देण्यात यावेत, असे आदेश दिलेले आहेत. तसेच विधी व न्याय विभागाने दि. २८ फेब्रुवारी, २०१७ च्या परिपत्रकान्वये एखाद्या न्यायालयीन प्रकरणातील आदेश तशाच स्वरुपाच्या प्रकरणातील इतर कर्मचारी न्यायालयात गेले नाही तरी, समान पातळीवरील सर्व प्रकरणामध्ये लागू करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सदर बाब विचारात घेवून श्री. ल.बे.हारोडे यांच्या निलंबन कालावधीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

| अ. क्र | कालावधी | दिवस | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | दि.०१/०८/२०२३ ते दि.२९/१०/२०२३ | ९० दिवस | सदर कालावधी हा निलंबन कालावधी मानण्यात यावे. |
| २ | दि. ३०/१०/२०२३ ते दि.१२/०५/२०२४ | १९५ दिवस | या निलंबन कालावधीमधील वेतन व भत्ते त्यांना निलंबित करण्यात आले नसते तर ते जितके वेतन व भत्ते मिळण्यास हकदार झाले असते तेवढे पूर्ण वेतन व भत्ते त्यांना देण्यात यावेत. सदर कालावधीमध्ये देण्यात आलेला निर्वाह भत्ता देय वेतनातून वजा करण्यात यावा. |
| ३ | दि. ३०/१०/२०२३ ते दि.१२/०५/२०२४ | १९५ दिवस | श्री. ल.बे.हारोडे यांचा हा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी म्हणून मानण्यात यावा. |
| ४ | दि. ०१/०८/२०२३ ते दि.२९/१०/२०२३ | ९० दिवस | या निलंबन कालावधीबाबत त्यांच्याविरुध्द लाचलूचपत प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल असलेल्या न्यायालयीन प्रकरणात अंतीम निर्णय आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. |

३. श्री.ल.बे.हारोडे, सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र यांच्या निलंबन कालावधीबाबत घेतलेल्या उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. सदर शासन आदेश विधि व न्याय विभाग, No.२२०/६३८/civil/confli/२०२४/A,Br, दि.१७.१०.२०२४ व सामान्य प्रशासन विभाग, अनौ.सं.क्र.८२/२४/विचौ-२, दि.०३.१२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१६१६५३५६४३०६ असा आहे .हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( अशोक आत्राम )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-** श्री. ल.बे.हारोडे, सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुख्यालय, मुंबई
(नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत)

**प्रत :-**

१) मा.मंत्री, अ.ना.पु.व ग्रा.सं. विभाग यांचे खाजगी सचिव.
२) अ.मु.स., अ.ना.पु. व ग्रा.सं.विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
३) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५) निवडनस्ती (ग्रासं-३)